

# अपंगांच्या व्यथा

लोकशाही मार्गाने अपंग शासनाला धारेवर धरून, आपले हक्क मिळवू शकतात, महाराष्ट्रातील तमाम अपंगाचरणी मी नतमस्तक होऊन मी विनंती करतो की, आपण एकत्रित होऊन महाराष्ट्र पातळीवर एक संघटना मजबूत करू. आपल्यातील हेवेदावे सोडून आपणाला अपंगाचे कल्याण करवायचे एवढे लक्षात आणूया, ज्या अपंग समाजात आपण जन्मलो किंवा अपंग झालो त्या अपंगाचे आपल्या हातून काहीतरी भले व्हावे, अशी जर आपण मनातून इच्छा ठेवली तर अपंगाचे भले झाल्याशिवाय राहणार नाही.


आनंदराव गायकवाड


मो.नं.९८६०५३७९१७


अंध,अपंग, मूकबधीर, मतीमंद, हा समाजातीलच एक मानवी घटक आहे. तो घटकसुध्दा भारतीय नागरीक आहे. भारतीय घटनेप्रमाणे प्रत्येक व्यक्तीला, जगण्याचा अधिकार आहे. प्रत्येक अपंगालासुध्दा मतदानाचा अधिकार आहे. परंतु अजूनही अपंग घटक हा समाजात उपेक्षित का? हा प्रत्येक अपंगाने विचार केला पाहिजे? कारण प्रत्येक एस.टी.स्टँन्डवर गेल्यानंतर तेथे मागणारा आपलाच एक बांधव दिसतो. मग भारत स्वतंत्र झालेला ६५ वर्षे होऊन गेले तरी आमची अपंग बांधवांची अजूनही उपेक्षाच का? आम्ही भारतीय नागरीक आहोत? आम्हालाही जगण्याचा हक्क आहे? आम्हालाही अन्न, वस्त्र, निवारा मिळविण्याच हक्क आहे. आम्हालाही मतदानाचा हक्क आहे. मग आम्ही अजूनही उपेक्षित का? हाच प्रश्न महाराष्ट्रातील तमाम अपंगाचा शासन कर्त्यांना आहे?

खरे पाहीले तर सन २०११ च्या जनगणनेचा विचार केला तर महाराष्ट्रात अपंगाची संख्या ५० लाखावर आहे. अपंगाची एवढी लक्षणीय लोकसंख्या असतांनासुध्दा शासनाने यांचेकडे पाहण्याचा दृष्टीकोन अजूनही बदललेला नाही. समाजात आजही या अपंगाकडे एक टाकीव घटक म्हणून पाहीले जाते. कुटुंबातूनही हा घटक दुर्लक्षित आहे. मग आमचे म्हणणे असे आहे की, तुम्ही आम्हाला संधी द्या, आम्ही इतरांपेक्षा चांगले काम करून दाखवू. आम्हीं जरी हाताने, पायाने, डोळ्याने अपंग असलो तरी आम्ही डोक्याने अपंग नाहीत. किती तरी डोक्याने अपंग असलेले वशिल्याचे टट्टू नोकरशाहीत आज आहे. आम्हाला ३ टक्के नोकरीत आरक्षण आहे. आमच्या किती जागा भरल्या जातात. त्या जागावर खऱ्या अपंगापेक्षा वशिल्याच्या खोटया अपंगाला लवकर घेतले जाते. मग आमचा अपंग बेकार होऊन रस्त्यावर भरकटत फिरतांना दिसतो. आजही आम्हा अपंगाचा निमशासकीय, शासकीय अनुशेष शिल्लक आहे. निमशासकीय शिक्षण संस्था सर्व राजकीय पुढाऱ्यांच्या आमदार, खासदारांच्या आहेत. पण तेथे बिचाऱ्या गरीब अपंगाला कोण घेतो? त्याला नोकरी दिली तर लाखो रूपये यांना कोण देणार? तर महाराष्ट्रातील तमाम अपंगांना माझे असे नम्रपणे सांगणे आहे की, लाचारी सोडून आपण संघटीत झालो पाहिजे. आपण भारतीय आहोत, भारताचे नागरीक आहोत, आपल्यालासुध्दा आपले हक्क मिळालेच पाहिजे.

आपणाला कोणतीच गोष्ट सहजा सहजी मिळाली नाही. एस.टी.प्रवास सवलतीचा लढा अपंगालाच करावा लागला, बिज भांडवल योजनाही शासनाने संघटनेच्या लढ्याशिवाय तुम्हाला दिलेली नाही. अपंग आर्थिक महामंडळाचा लढा तर अपंगांनी तब्बल १५ वर्षे केला. संजय गांधी निराधार योजना ६० रू. महिन्यापासून आज ६०० रुपयेपर्यंत आली. आपल्या शेजारच्या गोवा राज्यात अपंगाला प्रत्येकी २००० रू. पेन्शन विना अट देण्यात येते. मग आपल्या महाराष्ट्र राज्यातच हे का घडू शकत नाही? तर येथील शासनकर्ते हे मनाने अपंग आहेत. त्यांच्या मनात अपंगाबाबत आस्ताच नाही. अपंग म्हटले की, एक टाकीव वळचणीचा लाचार घटक म्हणून पाहिले जाते. मग आपल्या राज्यकर्त्यांना एवढे समजत नाही की, मी निवडून आलो त्यातील १० टक्के का होईना मते ह्या अपंग, अंधांचे मूकबधीरांचे आहेत. तेव्हा अपंग बांधवांनो आपणाला सुखाचे, समाधानाचे, स्वाभिमानाचे जीवन जगायचे असेल तर अपंग संघटीत झाले पाहिजे, संघटीत होऊन आपण आपले हक्क शासनाबरोबर संघर्ष करून मिळविले पाहिजे. महाराष्ट्रात आज अपंगाच्या अनेक संघटना आहेत. राष्ट्रीय अपंग विकास महासंघ, अनेक तालुका पातळीवर छोटया संघटना आहेत. तसेच राष्ट्रीय काँग्रेस पार्टीचा अपंग सेल आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अपंग सेल आहे. भारतीय जनता पार्टीचा अपंग सेल आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेवनेचा अपंग सेल आहे. परंतु कोणीही सर्वांना एकत्रित करत नाही. प्रत्येक संघटनेचा नेता हा आपणास सर्वात मोठा समजतो. तेव्हा महाराष्ट्रातील तमाम अपंगाना कोणत्या नेतृत्वाची कास धरावी हे कळत नाही. तेव्हा सर्व अपंगांना व सर्व अपंग संघटनांनी एकत्र होऊन शासनदरबारी संघर्ष केला तर अपंगाची कोणतीच गोष्ट अशयक्य नाही.

लोकशाही मार्गाने अपंग शासनाला धारेवर धरून, आपले हक्क मिळवू शकतात, महाराष्ट्रातील तमाम अपंगाचरणी मी नतमस्तक होऊन मी विनंती करतो की, आपण एकत्रित होऊन महाराष्ट्र पातळीवर एक संघटना मजबूत करू. आपल्यातील हेवेदावे सोडून आपणाला अपंगाचे कल्याण करवायचे एवढे लक्षात आणूया, ज्या अपंग समाजात आपण जन्मलो किंवा अपंग झालो त्या अपंगाचे आपल्या हातून काहीतरी भले व्हावे, अशी जर आपण मनातून इच्छा ठेवली तर अपंगाचे भले झाल्याशिवाय राहणार नाही.



**६५ वर्षे होऊन गेले तरी आमची अपंग बांधवांची अजूनही उपेक्षाच का? आम्ही भारतीय नागरीक आहोत? आम्हालाही जगण्याचा हक्क आहे? आम्हालाही अन्न, वस्त्र, निवारा मिळविण्याच हक्क आहे. आम्हालाही मतदानाचा हक्क आहे. मग आम्ही अजूनही उपेक्षित का? हाच प्रश्न महाराष्ट्रातील तमाम अपंगाचा शासन कर्त्यांना आहे?**